**निशाणी १८ वरील आदेशानुसार अर्जदार सविता रावसाहेब आहेर यांचा शपथेवर उलटतपास सा. वाला तर्फे ॲड. के. ए. व्यवहारे वकील यांचे मार्फत सुरु-**

मी इयत्ता पाचवी पर्यंत शिकलेली आहे. माझे लग्न दि. १८/०२/२००५ रोजी खलालपिंप्री येथे झाले. माझे आई-वडील बहिरवाडी येथे राहण्यास आहेत. मी पोटगीचा अर्ज दाखल केला आहे. मला दोन मुले नामे सुदर्शन व सार्थक आहेत. माझ्या सोबत मोठा मुलगा सुदर्शन असतो. माझा मोठा मुलगा अठरा वर्षाचा आहे. मी माझ्या आई-वडीलांकडे बहिरवाडी येथे राहते. मी बहिरवाडी येथे आई-वडीलांकडे राहत असल्याबाबत कागदोपत्री पुरावा दाखल करु शकते. मी तक्रारी अर्ज नवरा, सासु-सासरे व दिर यांच्याविरुध्द दाखल केला आहे. हे म्हणणे खरे नाही की, माझे लग्न साध्यापध्दतीने झाले होते. वरदक्षिणा म्हणुन एक लाख रुपये दिल्याबाबत माझ्याकडे कागदोपत्री पुरावा नाही. मंगळसुत्र, नेकलेस, कानातील झुबे याबाबत माझ्याकडे कागदोपत्री पुरावा आहे. संसार उपयोगी वस्तुबाबत माझ्याकडे कागदोपत्री पुरावा आहे. ते सर्व कागदोपत्री पुरावे मी न्यायालयात दाखल करण्यास तयार आहे. मी सदर गोष्टीबाबत पुढील तारखेस कागदोपत्री पुरावा दाखल करण्यास तयार आहे. हे म्हणणे खरे नाही की, आपल्या रिती रिवाजाप्रमाणे मंगळसुत्र हा नेहमी नवराच करत असतो. साक्षीदार स्वतहुन सांगते की, माझ्या आई-वडीलांनी मंगळसुत्र द ातले होते. मला माझ्या नव-याने बारा वर्ष नांदविले. मला सामनेवाला यांनी दि. ०१/०५/२०२२ रोजी मारहाण करुन मोठ्या मुलासह हाकलुन दिले होते व लहान्या मुलाला सामनेवाला यांनी ठेवुन घेतले होते. सदर मारहाणीबाबत मी पोलिस स्टेशनला तक्रार दाखल केली नव्हती. हे म्हणणे खरे नाही की, सामनेवाला हे मला म्हणु लागले की, तुझ्या आई-वडीलांनी मनाप्रमाणे लग्न लावुन दिले नाही, लग्नात हुंडा कमी दिला असे म्हणुन वारंवार त्रास देवु लागले हे मी खोटे सांगत आहे. मला त्रास दिल्याबाबत मी पोलिस ठाण्यात तक्रार दाखल केली होती. त्याबाबतची कागदपत्रे मी न्यायालयात दाखल करु शकते. हे म्हणणे खरे नाही की, सामनेवाला याने मला शिवीगाळ केली, टोचुन बोलले, मारहाण केली हे मी खोटे सांगत आहे. सामनेवाला यांनी शेडच्या बांधकामासाठी पैसे मागितल्याबाबतची तारीख अर्जामध्ये नमुद आहे परंतु ती मी सांगु शकत नाही कारण ती माझ्या लक्षात नाही. सामनेवाला हे माझा छळ करत होते त्याची तारीख माझ्या अर्जामध्ये नमुद आहे किंवा नाही हे मी सांगु शकत नाही, परंतु सामनेवाला हे माझा छळ करत होते. सामनेवाला यांनी माझ्या आई-वडीलांना पैसे मागितले ते माझ्या आई-वडीलांनी माझ्या लहान्या भावाला सांगितले व माझ्या लहान्या भावाने शेड बांधण्याकामी ५० हजार रुपये दिले याची तारीख मी सांगु शकत नाही.

पैसे दिल्यानंतर कोणत्या तारखेपासुन कोणत्या तारखेपर्यंत सामनेवाला यांनी मला चांगले नांदविले याची तारीख मी सांगु शकत नाही. सामनेवाला यांनी बोर घेण्यासाठी व नवीन मोटार सायकल घेण्यासाठी एक लाख रुपये घेवुन ये असे म्हणत असल्याची तारीख मी सांगु शकत नाही. सामनेवाला यांनी कोणत्या तारखेत छळ केला याची तारीख मी सांगु शकत नाही. साक्षीदार स्वतहुन सांगते की, रोजच छळ करत होते. सामनेवाला हे माझ्याकडुन शेतीचे व घराचे कामे करुन घेत होते याची तारीख वार मी सांगु शकत नाही. सामनेवाला यांनी दि. ०१/०५/२०२२ रोजी क्रुरपणे मारहाण केल्याबाबत मी सरकारी दवाखान्यात गेले होते. त्याबाबतची कागदपत्रे मी न्यायालयासमोर दाखल केली नाहीत. माझ्या आई-वडील व भावाने मला ब-याच वेळेस सामनेवालाकडे नांदविण्याचा प्रयत्न केला याची तारीख, वेळ, वार व वर्ष मी सांगु शकत नाही. सामनेवाला याच्या जमीनीचा गट नंबर मला माहिती नाही. सामनेवाला याला अडीच ते तीन एकर जमीन आहे. सामनेवाला याच्याकडे दोन गायी, दोन म्हशी व एक क्रेन आहे. सदर दोन गायी, दोन म्हशी व क्रेन सामनेवालाच्या नावच्या असल्याबाबत पावती मी न्यायालयात दाखल करु शकते. सामनेवाला याचे मोठे घर आहे व सहान जागा आहे याची कागदपत्रे मी न्यायालयात दाखल करु शकते. हे म्हणणे खरे नाही की, सामनेवाला हा मला नांदविण्यास तयार असुन मी स्वतहुन त्याचा त्याग केला आहे. हे म्हणणे खरे नाही की, प्रस्तुतचा अर्ज दाखल करण्यास कोणतेही कारण घडले नाही. हे म्हणणे खरे नाही की, माझे मन संसारात रमत नाही. हे म्हणणे खरे नाही की, सामनेवाला व त्याच्या आई-वडीलांनी मला खुप वेळेस नांदविण्याचा प्रयत्न केला परंतु मी स्वत नांदत नाही. हे म्हणणे खरे नाही की, सामनेवाला याने मला ॲड. डी. बी. बाचवे पाटील, वैजापुर यांच्या मार्फत नांदण्यास येणेबाबत नोटीस पाठविली परंतु मी नांदावयास गेले नाही. मला वैजापुर येथील न्यायालयातील एच.एम.पी.क्र.१४०/२०२२ ची नोटीस मिळाली नाही. हे म्हणणे खरे नाही की, सामनेवाला याने माझ्याविरुध्द वैजापुर न्यायालयात नांदावयास येणेबाबत दावा दाखल केला आहे. माझे सासर माळीसागर, ता. वैजापुर येथील आहे. माझ्या भावाचे नाव विकास भाउसाहेब शेजुळ असे आहे. हे म्हणणे खरे नाही की, सामनेवाला याने न्यायालयात येवु नये म्हणुन मी व माझ्या भावाने सामनेवाला यास दि. ०४/०१/२०२४ रोजी दम दिला. हे म्हणणे खरे नाही की, मी व माझ्या भावाने सामनेवाला याला दम दिल्याबाबत आमच्या विरुध्द तक्रार दाखल केली आहे. मला माझ्या भावाचा मोबाईल क्रमांक सांगता येत नाही कारण तो मला पाठ नाही. हे म्हणणे खरे नाही की, त्या तक्रारीमध्ये असे नमुद होते की, तु जर न्यायालयात आलास तर तुला भोकसुन टाकु असे म्हणुन

शिवीगाळ व जीवे मारण्याची धमकी दिली असे नमुद आहे. माझे सासर नेवासा पासुन ५० ते ६० किलोमिटर अंतरावर आहे. बहिरवाडी हे गाव नेवासा पासुन सात किलोमिटर अंतरावर आहे. दुरवरुन येण्याचे असल्यास कोणीतर सोबत लागते. हे म्हणणे खरे नाही की, माझ्या पतीसोबत आलेल्या लोकांना तुम्ही न्यायालयात यावयाचे नाही असे म्हणुन मी व माझ्या भावाने दम दिला. हे म्हणणे खरे नाही की, त्याबाबत मी व माझ्या भावाने तक्रार दाखल केली आहे. माझा भावाचा केशकर्तनाचा व्यवसाय आहे. माझ्या भावाचे अर्चना हॉटेल समोर दुकान आहे. हे म्हणणे खरे आहे की, माझ्या भावाच्या दुकानापासुन हाकेच्या अंतरावर पोलिस स्टेशन आहे. हे म्हणणे खरे नाही की, माझ्या भावाची नेवासा पोलिस स्टेशनमध्ये ओळख आहे. सामनेवाला हे शेतीतुन मका, कपासी, कांदे हे पिक घेतात याबाबत मी पुरावा न्यायालयात दाखल करु शकते. तसेच खर्च वजा जाता सामनेवाला याला तीन लाख रुपयाचे वार्षीक उत्पन्न मिळते याबाबत मी न्यायालयात कागदोपत्री पुरावा दाखल करण्यास तयार आहे. सामनेवाला याला दुग्ध व्यवसायापासुन दरमहा तीस हजार रुपये महिना मिळतो याबाबत मी पुरावा न्यायालयात दाखल करण्यास तयार आहे. सामनेवाला याला सहान जागेपासुन दरमहा पाच हजार रुपये किराया मिळतो याबाबत मी कागदोपत्री पुरावा दाखल करण्यास तयार आहे. हे म्हणणे खरे नाही की, मी स्वतहुन माझ्या पतीचा त्याग केलेला असल्यामुळे मला अन्न वस्त्र, पोटगीची गरज नाही. माझे पती शेती करतात. हे म्हणणे खरे नाही की, मी सरतपासात सांगितलेला सर्व मजकुर खोटा आहे. हे म्हणणे खरे नाही की, माझे पती मजुरी करतात व त्याला उत्पन्नाचे साधन नाही. हे म्हणणे खरे नाही की, मी माहेरी राहत असल्यामुळे माझ्या पतीचे कामधंद्यामध्ये लक्ष लागत नाही, त्यामुळे माझ्या पतीला उत्पन्नाचे साधन नाही. हे म्हणणे खरे नाही की, मी माझ्या माहेरी मजेत राहते. हे म्हणणे खरे नाही की, मी महिला असल्याचा फायदा घेवुन माझ्या पतीविरुध्द खोटी केस दाखल केलेली आहे. हे म्हणणे खरे नाही की, प्रस्तुतची घटना घडलेली नाही. हे म्हणणे खरे नाही की, मी आज रोजी खोटी साक्ष देत आहे. मी पुढील साक्षीदार कोण तपासणार आहे हे सांगु शकत नाही.

**उलटतपास पुर्ण, फेरतपास नाही.**

श्रवणोत्तर स्विकृती,

PRANITA RITESH SUGAONKAR

Digitally signed by PRANITA RITESH SUGAONKAR
Date: 2025.06.26 16:04:57 +0530

दिनांक :- २६/०६/२०२५

**(डॉ.पी. आर. सुगांवकर)**
न्यायदंडाधिकारी, प्रथम वर्ग,
न्यायालय क्र.१, नेवासा.